# <u>फ्लो-जो</u>




फ्लोरेंस ग्रिफिथ जॉयनर १९८८ सालच्या ऑलिंपिकनंतर खूपच प्रसिद्ध झाली. अमेरिकेच्या महिलांना धावण्याच्या शर्यतीत मिळालेल्या ६ सुवर्ण पदकांपैकी ३ एकट्या फ्लोरेंसने मिळवली. तिने १०० आणि २०० मीटरच्या शर्यतींमध्ये जागतिक विक्रम सुद्धा केले. तिचे हे विक्रम अजूनही कोणी मोडलेले नाहीत. म्हणजे आज सुद्धा फ्लोरेंस हीच जगातील सर्वात वेगवान धावपटू आहे.

फ्लोरेंसच्या नावातील पहिली अक्षरे घेऊन तिचे टोपण नाव तयार झाले - “फ्लो-जो.” फ्लो-जोचे कुटुंब लॉस एंजेलिस इथले. तिच्या कुटुंबात अकरा भावंडे होती. तिचे आई वडील वेगळे झाले होते. फ्लो-जो तिच्या आई बरोबर राहायची. ती तिच्या वडिलांना भेटायला मोहावी वाळवंटात जात असे. तिथेच सशांच्या मागे पळताना ती वेगात धावायला लागली.

फ्लो-जोची आई खूपच कडक होती. तिचे अनेक नियम होते. रविवार सोडून इतर दिवशी टीव्ही बघायला परवानगी नसे. फ्लो-जो मोठी झाल्यावर सुद्धा आईच्या नियमाचे पालन करत असे. ती रोज बायबल वाचत असे. जेवायच्या आधी प्रार्थना म्हणत असे.

फ्लो-जोने कमी अंतराच्या शर्यतींमध्ये पदके जिंकली. पण ती रोज तेरा मैल पळत असे. कधीतरी मेरेथोन मध्ये पळायची तिची इच्छा आहे. ती वजनांचा व्यायाम सुद्धा करते. ती ३२० पौंड वजनाने बैठका करते. फ्लो-जो अतिशय कष्टाळू आहे. तिचा ठाम विश्वास आहे - जोपर्यंत तुम्ही प्रयत्न थांबवत नाही, तोपर्यंत तुम्ही हारत नाही.

फ्लो-जो अनेक प्रकारच्या केशरचना करते. तिची नखे सहा इंच लांब आहेत आणि त्यांना ती अनेक चमकदार रंगांनी रंगवते. तिला चित्रे काढायला आवडतात. तसेच ती कविता करते आणि मुलांसाठी पुस्तके सुद्धा लिहिते.

~~~

१. फ्लो-जो हे टोपण नाव कसे तयार झाले?

---

२. हा धडा लिहिण्यामागे लेखकाचा उद्देश काय आहे?
   क) माहिती देणे. ख) मनोरंजन करणे ग) मन वळवणे

३. फ्लो-जो च्या यशाचे कारण काय आहे?

---

---

४. नामांचा पुन्हा पुन्हा वापर टाळण्यासाठी सर्वनामांचा वापर करतात. मी, तो, ती, मला, त्याला, तिला, तिची इ. सर्वनामांची काही उदाहरणे आहेत. वरील धड्यातील सर्वनामे शोधा व त्यांच्याखाली रेघ मारा.

५. नवीन शब्द: प्रसिद्ध, शर्यत, वेगवान, धावपटू, स्पर्धा, कष्टाळू, ठाम, केशरचना

६. तुमच्या आवडत्या खेळाडू बद्दल एक छोटा निबंध लिहा.
~~~